सुधारणा व पुनर्वसन
Tel.No. : (020)26124815
Fax No. : (020)26125878
Email ID : igoffice.ddo-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा**

**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,**
**कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,**
**पुणे ४११ ००१**

---

परिपत्रक

**विषय- कुटुंब कल्याण निधीतुन वैद्यकीय कारणास्तव मिळणारे कर्जाचे अर्ज विहीत नमुन्यात सादर करणे व सदर कर्जाची परतफेड विहीत कालावधीत करणेबाबत.**

जा.क्र.अपोमकावसु / कुकनी/वैद्य कर्ज-अर्ज नमुना / 8557 /२०२४ कक्ष-५ पुणे ०१ दिनांक ११ /१०/२०२४

मुख्यालया कडून कारागृह अधिकारी व कर्मचारी यांना वैद्यकीय कारणास्तव कुटुंब कल्याण निधीतुन कर्ज मंजुर करण्यात येते. तथापी कर्जाच्या अर्जाबाबत कारागृह विभागात एकवाक्यता येण्याच्या दृष्टीने सदरचे अर्ज एकसमान असणे गरजेचे आहे यास्तव पोलीस घटकाच्या अर्जाप्रमाणे या परिपत्रकासोबत अर्जाचा व हमीपत्राचा नमुना पाठविण्यात येत आहे. तरी प्रादेशिक कार्यालयामार्फत सदरचे अर्ज विहीत नमुन्यात व हमीपत्रासह यापुढे सादर करण्याची दक्षता कारागृह अधिकारी व संबधितांनी घेणे आवश्यक आहे. तरी कारागृह अधीक्षकांनी सदरच्या अर्जाचा नमुना व हमीपत्र कारागृहाच्या दर्शनी भागात डकविण्यात येऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन देण्यात यावे. व यापुढे कुटुंब कल्याण निधीतुन अग्रिमाची मागणी उक्त नमुन्या प्रमाणे सादर करण्याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी व कार्यालय प्रमुखांनी देखिल उक्त नमुन्यात मुख्यालयास प्रस्ताव सादर करावे.विहित नमुन्या खेरीज प्राप्त झालेले प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

तसेच अनेक कारागृहांकडुन अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात आलेले कुटुंब कल्याण निधीतुन दिलेल्या कर्जाची वसुली त्यांचे वेतनातुन समान हप्त्यात व विहीत कालावधीत वसुल करण्यात येत नसल्याचे निर्देशनास आले आहे.तरी याबाबत सदरची अनियमितता येऊ नये याकरिता सर्व संबधितांनी योग्य ती खबरदारी घेण्यात यावी.तसेच कर्ज वसुलीची माहिती पाठविणेबाबत यापुर्वी दिलेल्या सुचनांचे पालन करावे.सदरचे परिपत्रक प्राप्त झाल्याची पोहोच देण्यात यावी.

11/10

**(प्रशांत बुरडे)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रति,

१.अधीक्षक, मध्यवर्ती / जिल्हा / खुले (सर्व )
२.प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगअधिकारी प्रशिक्षण महाविदयालय,येरवडा / किशोर सुधारालय, नाशिक
३.संपर्क अधिकारी, खुली वसाहत आटपाडी.जि.सांगली.

प्रत:- माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१.विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्य विभाग,छ.संभाजीनगर/ नाशिक विभाग,नाशिक
२.कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग - पुणे, पूर्व विभाग- नागपूर, दक्षिण विभाग- मुंबई
३.सर्व कक्ष अधिकारी, अ.पो.म.सं व का.म.नि. कार्यालय,पुणे ०१

महाराष्ट्र कारागृह नियमावली **Chapter XII Staff Concessions And Rewards** मधील नियम- 10 (i) (ii) (a) (4) तरतुदी नुसार

## कुटुंब कल्याण निधीतुन कर्ज मंजुरीसाठी अर्ज

1.अर्जदाराचे नाव:-

2.अर्जदाराचे पदनाम:-

3.अर्जदाराचे नेमणुकीचे कार्यालय व ठिकाण:-

4.अर्जदार घेत असलेले मुळ वेतन:-

5.सेवानिवृत्तीचा दिनांक:-

6.अर्जदाराने मागणी केलेल्या कर्जाची रक्कम:-

7.कर्ज व्यक्तीश: अथवा कुटुंबातील सदस्या करिता :-

8.कर्जाकरिता रुग्णालयाच्या वैदयकीय अधिकारी यांचे अंदाजपत्रकांची मुळ प्रत:-
(मुख्यालया कडील परिपत्रका नुसार वैदयकीय अंदाजपत्र शासनमान्य रुग्णालयाच्या वैदयकीय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले असणे आवश्यक )

9.ज्या आजाराच्या उपचारासाठी कर्ज मागितले आहे त्या आजारास महाराष्ट्र कारागृह कुटुंब आरोग्य योजना (गणवेशधारी अधिकारी / कर्मचारी ) यांना लागु आहे किंवा कसे ? याबाबतचे प्रमाणपत्र:-

10.वैदयकीय कर्ज परतफेडीचे हमीपत्र सोबत जोडल्या प्रमाणे:-

दिनांक- अर्जदाराची सही

11.कार्यालय प्रमुखांचे अभिप्राय:-

कार्यालय प्रमुखांची सही

12.प्रादेशिक कार्यालय प्रमुखांची शिफारस:-

प्रादेशिक प्रमुखांची सही

## हमीपत्र

**कारागृह कुटुंब कल्याण निधीतुन मंजुर झालेले कर्जाची परतफेड करण्याचे हमीपत्र**

**मी,......** **कार्यालय:-.......**

खलील प्रमाणे लिहुन देतो की ,

1. कारागृह कुटुंब कल्याण निधीतुन मंजुर झालेल्या कर्जाची वसुली माझ्या वेतनातुन समान हप्त्यात कपात करावी. वसुल करावयाची रक्कम शिल्लक राहिल्यास माझे सेवानिवृत्ती नंतर मिळणाऱ्या उपदानाच्या रकमेतुन करण्यास माझी हरकत नाही.
2. कुटुंब कल्याण निधी वैदयकीय कर्ज व्याज दर 6.25 % मला मान्य असुन माझी या बाबत कोणतीही तक्रार राहणार नाही.
3. कुटुंब कल्याणनिधीतुन मंजुर झालेले कर्ज विहित अवधीत प्राधान्याने पुर्णत: परतफेड करीन.

**दिनांक:-**

**स्वाक्षरी :-**

**नाव :-**

**पदनाम :-**

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,यांचे
कार्यालय,जुनी मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,पुणे-१
दुरध्वनी क्र.०२०-२६१२४८१५
फॅक्स क्र. ०२०-२६१२५८७८
Email-Igoffice.ddo--mh@gov.in

परिपत्रक

जा.क्र. अपोमसंवकामनि/पुणे/कक्ष-५/कु.क.निधी/ ५५१५ /२०१९. दिनांक ०८/५/२०१९.

Despatched On ----------------

विषय:- कुटूंब कल्याण निधीतून देण्यात येत असलेल्या वैद्यकीय अग्रिमाबाबत.

संदर्भ:- मा अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.२५.०४.२०१९ रोजी झालेली बैठक

उपरोक्त संदर्भाकित विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवाबाबत कुटूंब कल्याण योजना दि.१६ ऑगष्ट २०१६ पासून लागू करण्यात आलेली असून या योजनेचा लाभ गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी सद्या घेत आहेत. याबाबत दिनांक २५.०४.२०१९ रोजी समितीची बैठक आयोजीत करण्यात आली त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

" जे अधिकारी/कर्मचारी वैद्यकिय कारणास्तव कुटूंब कल्याण निधीमधून अग्रिमाकरिता अर्ज करतात त्यांची मागणी योग्य आहे का? याची खात्री करुनच अधिक्षकांनी प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयामार्फत मुख्यालयास सादर करावेत कारागृह वैद्यकिय अधिकारी यांचे वैद्यकिय प्रमाणपत्रा ऐवजी शासन मान्य रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र यापुढे अग्रिमासाठी अनिवार्य असेल अधिकारी/कर्मचारी यांनी अग्रिमासाठी खोटी माहिती केल्यास त्यांची मुख्यालयस्तरील दक्षता पथकामार्फत चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल "

उक्त परिपत्रक अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे तसेच यापुढे प्रस्ताव सादर करताना वरिल आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

(मध्यवर्ती समितीच्या मान्यतेने)

(डॉ विठुल जाधव)
विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय)
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

प्रति,

अधिक्षक,
मध्यवर्ती/जिल्हा कारागृह/खुले/स्वतंत्रपूर खुली वसाहत,आटपाडी/रत्नागिरी विशेष कारागृह/किशोर सुधारालय नाशिक.

प्रत:- उपसचिव (तुरुंग) गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.

प्रत:- विशेष पोलीस महानिरीक्षक कारागृह, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई
कारागृह उपमहानिरीक्षक, पुणे/नागपूर/औरंगाबाद यांना माहितीस्तव.

प्रत:-लेखा अधिकारी,कक्ष क्रमांक-०८,अपोमसंवकामनि कार्यालय,म.रा.पुणे-१ यांना पुढील कार्यवाहीस्तव